एकनाथ म
पुण्य नगरी ▮ शनिवार,१६ एप्रिल २०१६ नाशिक

# टाकळीच्या रामदास स्वामी मठात आजपासून व्याख्यानमाला



(छायाचित्र : गणेश खिरकाडे)

नाशिक : हनुमान जयंतीनिमित्त आगर टाकळीच्या हनुमान मंदिराला करण्यात आलेली विद्युत रोषणाई.

**नाशिक** – श्री मारुती देवस्थान आणि राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामी मठात श्रीराम नवमी आणि हनुमान जयंतीनिमित्त दि. १५ ते २२ एप्रिल दरम्यान व्याख्यान आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रीराम आणि हनुमान भक्त समर्थ रामदास स्वामी यांनी १६३३ मध्ये टाकळी येथे गोमय हनुमानाची स्थापना केली. तेव्हापासून या मंदिरात रामनवमी आणि हनुमान जन्मोत्सव साजरा केला जातो. यावर्षीही हा उत्सव उत्साहात साजरा होणार आहे. यात आठ दिवस विविध व्याख्यानांचे आयोजन केले आहे. यासाठी मंदिराला रंगरंगोटी आणि विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. आज (दि. १५) या ठिकाणी रामजन्मोत्सव साजरा झाला. याशिवाय प्रकाश पाठक यांचे 'जगी सर्व सुखी असा कोण आहे' या विषयावर व्याख्यान झाले. शनिवारी (दि. १६) मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष सदानंद मोरे यांचे 'संत साहित्य आणि आपण' या विषयावर व्याख्यान होईल. याशिवाय रविवारी (दि. १७) यशवंत पाठक (विषय : उत्कट तेची घ्यावे), सोमवारी (दि. १८) कॅप्टन अतुल इंदूरकर (गुरू परंपरा आणि नामाचे माहात्म्य), मंगळवारी (दि. १९) श्री सच्चिदानंद कानेटकर (जय जय रघुवीर समर्थ), बुधवारी (दि. २०) संजय गोडबोले (मानवी जीवनात धर्माची आवश्यकता), गुरुवारी (दि. २१) ऋतुजा वाळिंबे (श्री हनुमान चरित्र), शुक्रवारी (दि. २२) सूर्योदयाच्या वेळी हनुमान जन्मोत्सव, सकाळी ९ वाजता भीमरुपी महारुद्रा या मारुती स्तोत्राचे पठण, १० ते १२ दरम्यान स्वामी जोमानंद महाराज (खामगाव) यांचे 'जीवन देवाचे, आचरण माणसाचे' या विषयावर व्याख्यान होईल. सायंकाळी ४ ते ६ दरम्यान स्वराली जोगळेकर, ऋतुजा नाशिककर, वैदेही नाशिककर यांच्या भक्तीगीतांचा कार्यक्रम होईल. नाशिककरांनी या कार्यक्रम व व्याख्यानांचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे विश्वस्त जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन. के. ब्रह्मे, सुधीर शिरवाडकर, ज्योतिराव खैरनार, प्रकाश पवार, दिलीप कैचे, विजया माहेश्वरी आदींनी केले आहे.